# प्रकरण - पाचवे

# उपसंहार

# प्रकरण - पाचवे
# उपसंहार

ना. धों. महानोर यांच्या कवितांची नाळ ग्रामीण जनजीवनाच्या तळाशी जोडलेली असून अतिशय प्रसन्न, निसर्गातील सप्तरंगांची उधळण करणारी महानोरांची कविता हा मराठी कवितेचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. विशेषतः ग्रामीण संस्कृतीचा अस्सल अविष्कार त्यांच्या दीर्घ कवितेतून अधिक प्रभावीपणे झालेला दिसून येतो. महानोरांच्या 'प्रार्थना दयाघना' आणि 'गंगा वाहू दे निर्मळ' या कवितासंग्रहातील दीर्घ कविता प्रस्तुत लघुप्रबंधासाठी निवडलेल्या असून त्यातून त्यांनी ग्रामीण संस्कृतीच्या वैविध्यपूर्ण पैलूंचे विवेचन केले आहे.

१९२५ च्या आसपास ग्रामीण कवितेच्या लेखनाला सुरूवात झाल्याने या काळातील कवितेतून वास्तव चित्रणापेक्षा ग्रामीण भागाचे काल्पनिक वर्णनच अधिक झाल्याचे दिसून येते. ग्रामीणतेला स्पर्श न होताच या कविता लिहिल्या गेल्या आहेत. मात्र १९६० नंतर मराठी ग्रामीण कविता खऱ्या अर्थाने बहरलेली दिसते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सामाजिक, राजकीय, शैक्षणिक इ. सर्वच बाबतीत झालेल्या आमुलाग्र बदलांमुळे साहजिकच ग्रामीण जीवनातही बदल होऊन एकंदरीतच ग्रामीण साहित्यातही बरेच बदल झालेले आहेत. ग्रामीण कथा, कादंबरी प्रमाणेच कवितेतही 'ग्रामीण संस्कृती' ला स्थान मिळालेले आहे.

केवळ कल्पनाविलासातच रंगून न जाता हाडामासाच्या माणसाचे, त्याच्या जीवनाचे वास्तव चित्रण ग्रामीण कवितेतून होवू लागले. १९८५ नंतर ग्रामीण कवितेचा वाटा अधिक ठळक दिसू लागल्याचे प्रकर्षाने दिसून येते. या दृष्टीने एकूण कवितेतील ग्रामसंस्कृतीच्या चित्रणाचा अभ्यास मराठी समीक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणारा आहे.

महानोरांच्या बाबतीत विचार करत असता त्यांनी स्फूट कवितात ग्रामजीवन ज्या स्तरावर रेखाटले आहे. त्या स्तरावरील प्रकट चिंतनात्मकता त्यांच्या दीर्घ कवितेत अधिक स्पष्टपणे व प्रभावीपणे व्यक्त झाल्याचे दिसून येते. त्याचबरोबर महानोरांच्या दीर्घ कवितेतील ग्रामीण जनजीवनाचे वर्णन हे ग्रामीण संस्कृतीच्या परिप्रेक्षात स्वतःचा आत्मशोध घेणारे आहे. प्रस्तुत लघुप्रबंधाच्या संशोधन निमित्ताने निवडलेल्या कविता संग्रहांमधील दीर्घ कवितांमधून महानोरांनी वर्षानुवर्षे सलगपणे पडणाऱ्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर दयाघनाकडे प्रार्थना करून त्याच्याकडे गंगा वाहू दे निर्मळ असा आशावाद व्यक्त केला आहे.

ना. धों. महानोरांच्या दीर्घ कवितांचा अभ्यास ('प्रार्थना दयाघना' व 'गंगा वाहू दे निर्मळ' यांच्या अनुषंगाने) हा संशोधनासाठी निवडलेला विषय लघुप्रबंधातून मांडत असताना -

१) मराठी ग्रामीण कविता व ना. धों. महानोर

२) दीर्घ कविता : संकल्पना व परंपरा

३) 'प्रार्थना दयाघना' व 'गंगा वाहू दे निर्मळ' मधील आशयसूत्रे

४) ना. धों. महानोरांच्या दीर्घ कवितेचे विशेष

५) उपसंहार

या उपरोक्त प्रकरणांमधून शीर्षकपरत्वे चर्चा केलेली आहे. ती संक्षिप्त रूपामध्ये पुढीलप्रमाणे मांडलेली आहे.

**१) मराठी ग्रामीण कविता व ना. धों. महानोर :-**

ग्रामीण कवितेच्या संदर्भात विचार करत असताना महात्मा फुले यांच्या कविता, केशवसुतांची 'एक खेडे' ही कविता या कवितांपासून ग्रामीण कवितेचा प्रवास तुरळक प्रमाणात का होईना झालेला दिसतो. १८९७ च्या दरम्यान कवी माधवानुज यांनी 'दगड फोडताना', 'मुलांचा कोंडवाडा' इ. कवितेतून ग्रामीण जनतेच्या दु:खाचे वर्णन घडविलेले आहे.

१९११ साली चंद्रशेखरांच्या काय हो चमत्कार या खंडकाव्याने ग्रामीण कवितेस चालना मिळाली तर १९३३ मध्ये ग. ल. ठोकळ यांनी 'सुगी' नावाचा जानपद गीतांचा संग्रह प्रसिद्ध केल्यानंतर खऱ्या अर्थाने आपणास ग्रामीण कवितेची पहाट झालेली पहावयास मिळते. १९८५ नंतरच्या पिढीमध्ये प्रामुख्याने ना. धों. महानोर, विठ्ठल वाघ, इंद्रजित भालेराव, श्रीकांत देशमुख, राजन गवस यांच्या कवितांमधून ग्रामीण जीवन प्रभावीपणे प्रकट झालेले आहे. ह्या कवींनी तळमळीने केलेले ग्रामीण भागातील अस्सल संस्कृतीचे वास्तव चित्रण त्यांच्या कवितांमधून प्रभावीपणे जाणवते.

ग्रामीण कवितेत वेगळा ठसा उमटवणाऱ्या ना. धों. महानोर यांनी अत्यंत प्रभावी आणि परिणामकारक शब्दात आपल्या दीर्घ कवितेतून ग्रामीण वास्तवाविषयी भाव मांडलेले आहेत. या प्रकरणातून ना. धों. महानोरांच्या दीर्घ कवितेपर्यंत जाऊन पोहचणाऱ्या काव्यप्रवासातील महत्त्वाचे

टप्पे मांडले आहेत. सभोवतालची परिस्थिती माणसाच्या पर्यायाने कवीच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावत असते. कवीच्या शब्दांशब्दांमधून कवीचे व्यक्तिमत्त्व बहरत असते. कवितेची विशिष्ट लयीतील बांधणी, नेमक्या शब्दातील शब्दगुंफण, अनुभव आविष्कृत करण्याची हातोटी या सर्व गोष्टींमध्ये कविचे व्यक्तिमत्त्व दडलेले असते.

ना. धों.महानोरांचा जन्म १६ सप्टेंबर १९४२ रोजी पळसखेडे या खेड्यात झाला. मुळातच शेतकरी कुटूंबात जन्म झाल्याने व अंगी उपजतच असलेल्या प्रतिभाशक्तीने महानोरांच्या कवितेतून ग्रामीणतेला स्थान मिळालेले आहे. दिवसभर हिरव्या-पिवळ्या पिकांमधून रानातल्या पायवाटा तुडविताना सभोवताली असणाऱ्या झाडांचा हिरवाकंचपणा, जांभळं आभाळ, डोंगर दऱ्या यातून खळखळणारे पाणी यांच्या साक्षीनेच त्यांच्या 'रानातल्या कविता' साकारलेल्या आहेत. महानोरांच्या कवितेमधून प्रकट होणारा निसर्ग म्हणजे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक अविभाज्य घटक मानता येईल. रानातल्या सततच्या सान्निध्यामुळे महानोरांनी निसर्गाला शब्दात बांधलेले आहे. रानातल्या कवितांचा विचार करता महानोरांच्या कविता ना. घ. देशपांड्यांच्या कवितांप्रमाणे शृंगारिक वर्णनाकडे झुकलेल्या आहेत. परंतु ना. घ. देशपांड्यांच्या कवितेशी महानोरांच्या कविता समरूप वाटत असल्या तरी एकरूप मात्र निश्चितच ठरत नाहीत.

महानोरांच्या 'रानातल्या कविता'नंतर 'वही' (१९७२), 'पावसाळी कविता' (१९८२) हे कविता संग्रह प्रसिद्ध झालेले आहे. या कविता संग्रहातील बऱ्याचश्या कविता प्रेमभावनेशी निगडीत आहेत. 'रानातल्या कविता', ' वही' या कवितासंग्रहामधून आलेल्या सामाजिक कवितेच्या तुलनेत पावसाळी कवितेतील सामाजिक कवितांची संख्या अधिक दिसून येते. महानोरांच्या काव्यप्रवासात उत्तरोत्तर वाढत गेलेली सामाजिकता वास्तव जीवनानुभवाकडे वळलेली दिसते. याच भावनेतून पुढे आलेल्या 'प्रार्थना दयाघना' (१९९०) त्याचबरोबर 'गंगा वाहू दे निर्मळ' (२००७) अशा दीर्घ कवितासंग्रहांची निर्मिती झालेली आहे. पावसाळी कवितेतून अल्प प्रमाणता का होईना परंतु सामाजिक जाणिवांचा वेध घेणाऱ्या या कवितांचा झालेला वावर म्हणजे 'प्रार्थना दयाघना', 'गंगा वाहू दे निर्मळ' या कविता संग्रहांमधील दीर्घ कवितांच्या गर्भखुणाच ठरल्या आहेत.

कल्पकतेचा वरद हस्त लाभलेल्या ना. धों. महानोरांनी (१९८४) 'अजिंठा' या खंडकाव्याच्या निमित्ताने त्यांच्या काव्यप्रवासात एक नवा टप्पा मांडला आहे. मेजर गील आणि बंजारी जातीची,

आदिवासी समाजातील पारू यांचे अजिंठ्याच्या साक्षीने घडलेले प्रेमशिल्प या खंडकाव्यातून भावसत्याद्वारे प्रकट झालेले आहे. 'जैत रे जैत' शिवाय इतर काही चित्रपटातील चित्रपट गीतांची रचना करणाऱ्या महानोरांच्या 'गाथा शिवरायाची'(१९९१) व 'जगाला प्रेम अर्पावे' (२००५) यासारखे व्यक्तिचित्रणात्मक कवितासंग्रह त्यांच्या नावावर दिसून येतात. 'पळसखेडची गाणी' हे महानोरांनी पळसखेड आणि तेथील परिसरातील लोकगीतांच्या संकलनाचे संपादित केलेले पुस्तक आहे.

एकूणच या प्रकरणामध्ये मराठी ग्रामीण कवितेची वाटचाल संक्षिप्तपणे मांडून ना. धों. महानोरांच्या काव्यप्रवासातील टप्पे मांडलेले आहेत. त्याचबरोबर ग्रामीण कवितेत वेगळा ठसा उमटवणाऱ्या महानोरांनी अत्यंत प्रभावी आणि परिणामकारक शब्दात आपल्या दीर्घ कवितेतून ग्रामीण वास्तवाविषयी भान मांडलेले आहे. याचे विवेचन या प्रकरणातून केले आहे.

**२) दीर्घ कविता : संकल्पना व वाटचाल :-**

या प्रकरणामध्ये दीर्घ कवितेची संकल्पना स्पष्ट करून दीर्घ कवितेची परंपरा संक्षिप्त स्वरूपात मांडलेली आहे. गद्यार्थी तार्किकता आणि सूत्रबद्धतेबरोबरच दीर्घ कवितेचा पैस आणि आवाका विस्तृत स्वरूपाचा असतो. दीर्घ कवितेच्या निमित्ताने स्त्रीच्या प्रतिभाशक्तींचा वावर मुक्तपणे झाल्याचे प्रकर्षाने दृष्टीक्षेपात येते. या कवितेचे यश फक्त आशसघनतेवर, तिच्या रचनाप्रभुत्वावर, बाह्य विचारानुभवांवर किंवा व्यक्तित्वावरही अवलंबून नसते. तर या सर्वांच्या बरोबर असणारी आणि काव्यातून सिद्ध होणारी अनुभवांची प्रखरता तिच्या यशात अधिक महत्त्वाची ठरते. प्रामुख्याने दीर्घ कविता ही तिचे स्वरूप, तिचा घाट, तिचा आशय या प्रमुख वैशिष्ट्यांनी स्फुट कवितेपेक्षा वेगळी ठरते. दीर्घ कवितेबद्दल विचार करताना इतर कवितेच्या तुलनेत दीर्घ कवितेचा आकृतीबंध काव्याच्या प्रकट चिंतनाच्या दृष्टीने प्रभावी आणि परिणामकारक ठरणारा आहे. दीर्घ कवितेचा आशय आणि आविष्कार हे दोन्हीही घटक स्फुट कवितेपेक्षा वेगळे आहे. ह्या वेगळेपणाचे साधार विवेचन प्रस्तुत प्रकरणातून केले आहे.

**३) 'प्रार्थना दयाघना' व 'गंगा वाहू दे निर्मळ' मधील आशयसूत्रे :-**

'प्रार्थना दयाघना' (१९९०) या ना. धों. महानोरांच्या ग्रामीण दीर्घ कवितासंग्रहातून व 'गंगा वाहू दे निर्मळ' या बहुतांशी ग्रामीण दीर्घ कविता असलेल्या कवितासंग्रहातून ग्रामीणतेचे, तिथल्या सुखदु:खाचे झालेले चित्रण व ग्रामीण जनजीवनाचे आशयदृष्ट्या स्पष्टीकरण प्रस्तुत प्रकरणातून मांडलेले आहे.

ना. धों. महानोर यांच्या 'प्रार्थना दयाघना' या कवितासंग्रहातून बदललेल्या निसर्गाचे स्वरूप, पाण्यावाचून सलगपणे पडलेल्या दुष्काळाचे 'वास्तव' चित्रण आहे. देशात व महाराष्ट्रात घोर दुष्काळी वणव्याने शेतीवाडी, पीकपाणी, राज्यकर्ते, माणसां-माणसांमधील माणुसकी सारे काही छिन्न-विछिन्न करून टाकले आहे. त्यामुळे उद्‌ध्वस्त झालेल्या खेड्यांची मोडतोड कित्येक वर्षे भरून निघणे कठीण आहे. या परिस्थितीस इथली समाजव्यवस्था व त्याचबरोबर इथले राज्यकर्तेही तितकेच जबाबदार आहेत. ही बहुसंख्य समाजव्यवस्थेची होणारी होरपळ पाहिल्यांनतर हे देवा दयाघना म्हणून महानोर देवाकडे पावसासाठी 'प्रार्थना दयाघना' मधून प्रार्थना करतात. प्रार्थना दयाघनामधून महानोरांनी ग्रामीण संस्कृतीचे वास्तव चित्रण अधिक प्रगल्भ आणि प्रभावीपणे मांडलले आहे. पावसाच्या आगमनाबद्दल चिवट श्रद्धा-आशावाद व्यक्त करणाऱ्या या दीर्घ कवितांमूधन महानोरांनी ध्येयध्यास आणि उदात्त जीवनमूल्यांचा शोध घेतलेला आहे.

तर 'गंगा वाहू दे निर्मळ' मधील आलेल्या दीर्घ कवितांमधून बदललेली सामाजिक, राजकीय, कौटूंबिक परिस्थिती, निसर्गाचा ढळत चाललेला समतोल आणि या साऱ्यांमुळे आयुष्यात प्रत्येक ठिकाणी येणाऱ्या वैफल्यग्रस्त मनाचे चित्रण केलेले आहे. एकूणच महानोरांच्या या संग्रहातील दीर्घ कवितांमधून जागतिकीकरणामुळे बदललेल्या ग्रामीण भागाचे चित्रण आलेले आहे. यातूनच नव्याने निर्माण झालेल्या प्रश्नांभोवती ह्या दीर्घ कविता अंतर्मुख होताना दिसतात. दरसाल चकवा देणाऱ्या पावसामुळे शेतीची आणि परिणामी शेतकऱ्यांच्या कसलेल्या काळजाची व्यथा महानोरांच्या प्रस्तुत दीर्घ कवितांमधून मांडलेली असून प्राप्त परिस्थितीही बदलू शकते असा आशावाद महानोरांनी येथे व्यक्त केलेला आहे. एकूण महानोरांच्या दीर्घ कवितेतील आशावादी आणि वास्तवदर्शी असणारा आशय कोणत्याही सजावट प्रतिमांची झुल पांघरून अभिव्यक्त न होता ग्रामीण वास्तवाशी थेट भिडतो.

एम. फिल. लघु प्रबंधाच्या संशोधन निमित्ताने निवडलेल्या ना. धों. महानोरांच्या 'प्रार्थना दयाघना' व 'गंगा वाहू दे निर्मळ' या कवितासंग्रहांतील वास्तववादी जीवनाचा वेध घेणाऱ्या कवितांचा सांगोपांग विचार या प्रकरणातून केलेला आहे.

**४) ना. धों. महानोरांच्या दीर्घ कवितांचे विशेष :-**

निसर्गातल्या सभोवतालच्या परिस्थितीतील बदलांना सहज टिपणारे कवीमन लाभलेल्या ना. धों. महानोर यांनी स्फुट कविता, खंडकाव्य, चित्रपट गीते असा एकूण काव्यप्रवास केला असला

तरी या त्यांच्या काव्यरचनेबरोबरच 'प्रार्थना दयाघना'व 'गंगा वाहू दे निर्मळ' या कविता संग्रहातील दीर्घ कविता आणि इतरत्र आलेल्या त्यांच्या दीर्घ कवितांमधून महानोरांच्या प्रतिभेचा एक नवा पैलू आपणास दिसतो. महानोरांच्या ह्या दीर्घ कविता सद्य सामाजिक आणि राजकीय परिस्थितीबद्दल तीव्र असंतोष व्यक्त करतात.

साध्या, सरळ, सहजसंवादी शब्दरचनेमधून व्यक्त होऊन वाचकाशी प्रभावीपणे परिणामकारक सुसंवाद साधणाऱ्या महानोरांच्या दीर्घ कविता ग्रामीण माती-माणसांशी एकरूप झालेल्या आहेत. त्या अलौकिक भावावस्थेतून निर्माण झालेली काव्यातील प्रतिमासृष्टी, भाषेचा अस्सलपणा आणि मातीशी गुंतलेल्या जीवांच्या सुख-दुःखांचे प्रसंगांचे चित्रण नेमक्या शब्दातून अभिव्यक्त केलेले आहे. या अभिव्यक्तीतून महानोरांच्या दीर्घ कवितेतील 'वास्तव' चित्रण अधिक वेधक ठरते, या दृष्टीने आशय व अभिव्यक्तीची ठळक वैशिष्ट्ये या प्रकरणातून नोंदविलेली आहेत.

-----x-----